"परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेच्या" अंमलबजावणीची कार्यपध्दती
अंशदानाची वसुली - आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना सूचना

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन परिपत्रक, क्रमांक : अंनियो १००७/६७ /सेवा- ४
मंत्रालय, मुंबई - ४०० ३२, दिनांक ३० ऑक्टोबर,२००७

**वाचा :** - १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७
२)शासन परिपत्रक, क्रमांक : अंनियो १००७/६७ /सेवा- ४, दि. २८ सप्टेंबर २००७

## परिपत्रक

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. अंनियो १००७/१८/सेवा -४, दि. ७ जुलै २००७ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजनेची अंमलबजावणी सविस्तरपणे विहित करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ८ मध्ये अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे नमुना -१ मधील अर्ज सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी प्राप्त करावेत आणि ते राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे दि. १५ ऑगस्ट २००७ पूर्वी पाठवावेत. त्याचप्रमाणे उपरोक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. १४ मध्ये असे निदेश देण्यात आलेले आहेत की, या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्याच्या वेतनातून करावयाची अंशदानाची वसुली माहे सप्टेंबर २००७ च्या वेतनातून (जे ऑक्टोबर २००७ मध्ये देय ठरेल) सुरु करण्यात यावी. तथापि लेखा क्रमांक देण्याची कार्यवाही विहीत वेळेत पूर्ण झाली नसल्याने कर्मचाऱ्याच्या वेतनातून करावयाच्या अंशदानाच्या वसुलीची मुदत, शासन परिपत्रक, क्र: अंनियो १००७/६७ /सेवा- ४, दि. २८ सप्टेंबर २००७ अन्वये एका महिन्याने वाढविण्यात आली. मात्र शासनाच्या आता असे निदर्शनास आले आहे की, काही प्रशासकीय अडचणींमुळे नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांकडून विहीत नमुन्यात माहिती प्राप्त करुन घेवून त्यांचे अर्ज राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे पाठविण्यात आले नाहीत किंवा अशा कर्मचाऱ्यांना अद्यापि निवृत्तिवेतन लेखा क्रमांक देण्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही.

२. वरील परिस्थिती विचारात घेऊन, सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना व कोषागार कार्यालयांना अशा सूचना देण्यात येत आहेत की, कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन लेखा क्रमांक मिळाला नसल्यास, अशा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत निवृत्तीवेतन लेखा क्रमांकाची वाट न पाहता, त्यांच्या माहे ऑक्टोबर २००७ च्या (जे नोव्हेंबर २००७ मध्ये देय ठरेल) वेतनातून अंशदानाची वसुली करुन, वेतनाची देयके सादर करावीत. दरम्यान अशा कर्मचाऱ्यांचे अर्ज राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे पाठवून निवृत्तिवेतन लेखा क्रमांक घेण्याची कार्यवाही विनाविलंब करण्यात यावी व त्या पुढील महिन्यात अंशदान कपातीचे सुधारीत विवरणपत्र सादर करावे.

३. निवृत्तीवेतन लेखा क्रमांकासह सुधारीत विवरणपत्र राज्य अभिलेख देखभाल अभिकरणाकडे सादर करेपर्यंत, अंशदान कपात केलेली विवरणपत्रे कोषागार कार्यालयाने जतन करावीत.

४. हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २००७१०३०१८२१०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

उ.प्र.महाजन

**उषा प्र. महाजन**
**शासनाच्या उप सचिव**

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई (५ प्रती),
महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर

अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई (२५ प्रती),
संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
(५० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती),
उप-मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती (प्रत्येकी १०प्रती),
वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे/नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक (प्रत्येकी १५ प्रती),
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती),
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (प्रत्येकी १० प्रती),
सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
उप मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण कुटीर क्र.३ व ४,
मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
अधिदान व लेखा कार्यालय आवार, मंत्रालयासमोर, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी (प्रत्येकी २५ प्रती),
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती),
तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती),
संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई (५ प्रती),
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी ३ प्रती),
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, दक्षिण/उत्तर/पश्चिम,
सर्व प्रशासन अधिकारी, नगरपालिका शिक्षण मंडळ (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती),
सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण) (प्रत्येकी ५ प्रती)
कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर (१० प्रती),
कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ , परभणी (१० प्रती),
कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला (१० प्रती),
कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी (१० प्रती),
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (१२ प्रती),
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई (२५ प्रती),
कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (१० प्रती),
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

---
*पत्राद्वारे.